**नियमित दिवाणी दावा क्र. १११/२०२४ मधील**
**अर्ज निशाणी क्रमांक ३७ खालील आदेश**
**(CNR NO. MHWS050006022024)**

१) वादींतर्फे दिलेल्या अर्ज निशाणी क्र.३६ खालील आदेशानुसार प्रस्तुतचा दावा आजरोजीच्या बोर्डावर घेण्यात आलेला आहे.

२) वादी यांचेतर्फे प्रस्तुतचा अर्ज हा तात्पुरत्या मनाईच्या अर्ज निशाणी क्र. ५ बाबत सुणावणी होईपर्यंत प्रतिवादी क्र. ३ भुमिअभिलेख कार्यालय व महसूल विभाग यांनी दावा मिळकत गट क्र. ७६ व २४ च्या अनुषंगाने व दिनांक २९.१०.२०२५ रोजीच्या पोट हिस्सा मोजणी नोटीसच्या अनुषंगाने मोजणी करुन वाटणी करुन ताबा देवू नये म्हणून दावा मिळकतीबाबतची आजरोजीची असलेली परिस्थिती ''जैसे–थे'' ठेवणेचा आदेश पारीत करण्यासाठी दिलेला आहे. आजरोजी वादी क्र. १ व २ आणि त्यांचे विधीज्ञ श्री. व्ही.ए.बेलोकार हे हजर आहेत.

३) प्रस्तुतचा अर्ज वाचला आणि प्रतिवादी क्र. ३ यांचेतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्याच अर्जावर दिलेले म्हणणे विचारात घेतले. वादींनी कागदपत्राची यादी निशाणी क्र. ३९ व ४१ अन्वये आजरोजी दाखल केलेली कागदपत्रे पाहीली. वादींचे विधीज्ञ श्री. व्ही.ए.बेलोकार यांचा आणि प्रतिवादी क्र. ३ सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस.के.गिमेकर यांचा युक्तिवाद ऐकला.

४) वादी यांच्या विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला की, वादींनी प्रस्तुतचा दावा हा जाहिर ठरावासाठी, कायम मनाईसाठी तसेच उपविभागीय तथा दंडाधिकारी मंगरुळपीर यांच्या दिनांक १९.१.२०२४ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने दाखल केला आहे. वादींचा तात्पुरता मनाईचा अर्ज युक्तीवादासाठी प्रलंबीत आहे परंतू प्रतिवादी क्र. ३ उपविभागीय अधिकारी मंगरुळपीर यांनी या दाव्यात त्यांचा लेखी जबाब दाखल केला नाही आणि प्रस्तुतचा दावा न्यायप्रविष्ट असताना प्रतिवादी क्र. ३ व महसूल अधिकारी हे दावा मिळकत गट क्र. ७६ व २४ मध्ये जावून पोटहिस्सा मोजणी करण्यासाठी त्यांनी दिनांक २९.१०.२०२५ रोजी वादी व प्रतिवादी यांना दिनांक ११.१२.२०२५ या मोजणीच्या दिनांकादिवशी हजर राहावे म्हणून नोटीसा पाठविलेल्या आहेत. वादी व प्रतिवादी यांना भुमिअभिलेख कार्यालय मंगरुळपीर यांनी

दिनांक २९.१०.२०२५ रोजीच्या दोन पोटहिस्सा मोजणी नोटीस पाठविलेल्या आहेत व त्याच्या छायांकीत प्रती वादींनी कागदपत्राची यादी निशाणी क्र. ३९ आणि दिनांक ११.१२.२०२५ रोजी पोष्टाने पाठविलेले जा.क्र. ९४५६ चे पत्र यांच्या छायांकीत प्रती कागदपत्राची यादी निशाणी क्र. ४१ सोबत दाखल केलेले आहेत. प्रतिवादी क्र. ३ हे वादींना मोजणीवर स्थगिती आणावी असे म्हणत आहेत. वादींचा तात्पुरता मनाईचा अर्ज निकाली निघण्यास बराचसा कालावधी लागणार आहे. तरी, तात्पुरत्या मनाईच्या अर्ज निशाणी क्र. ५ बाबत सुणावणी होईपर्यंत प्रतिवादी क्र. ३ भुमिअभिलेख कार्यालय व महसूल विभाग यांनी दावा मिळकत गट क्र. ७६ व २४ च्या अनुषंगाने व दिनांक २९.१०.२०२५ रोजीच्या पोट हिस्सा मोजणी नोटीसच्या अनुषंगाने मोजणी करुन वाटणी करुन ताबा देवू नये म्हणून दावा मिळकतीबाबतची आजरोजीची असलेली परिस्थिती ''जैसे–थे'' ठेवणेचा आदेश पारीत करण्यात यावा. प्रतिवादींच्या विरुध्द जैसे थे चा आदेश पारित झाला नाही तर वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल आणि प्रस्तूतचा दावा दाखल करण्याचा उद्देश विफल होईल.

५) प्रतिवादी क्र. ३ उपअधिक्षक भुमिअभिलेख कार्यालय मंगरुळपीर यांचेतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी असा युक्तीवाद केला की, वादींच्या प्रसतुतच्या अर्जास प्रतिवादी क्र. ३ यांची हरकत आहे त्यामुळे वादींचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

६) अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वादीं प्रस्तुतचा दावा उपविभागीय अधिकारी मंगरुळपीर यांच्या दिनांक १९.१.२०२४ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने जाहिर ठरावासाठी व कायम मनाईसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ११ आणि प्रतिवादी क्र. ७, ८ व १० यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ मधील आदेश ७ नियम ११ नुसार दिलेले दोन्ही अर्ज निशाणी क्र. २२ व २६ हे दिनांक ४.९.२०२५ रोजीच्या आदेशानुसार नामंजूर झालेले आहेत. प्रतिवादी क्र. ३ उप अधिक्षक भुमिअभिलेख यांच्यातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता हे वकीलपत्र निशाणी क्र. ११ नुसार दिनांक ३.१.२०२५ रोजी या दाव्यात हजर झाले आहेत परंतू त्यांनी त्यांचा लेखी जबाब दाखल केलेला नाही. या परिस्थीतीत वादींचा तात्पुरता मनाईचा अर्ज निशाणी क्र. ५ हा युक्तीवादासाठी प्रलंबीत आहे व तो निकाली निघण्यास काही कालावधी लागणार आहे व तो पर्यंत दावा मिळकत गट क्र. ७६ व २४ यांची दिनांक २९.१०.२०२५ रोजीच्या पोट हिस्सा मोजणी नोटीसच्या अनुषंगाने

मोजणी झाली आणि वाटणी करुन ताबा दिला तर वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल तसेच गट क्र. ७६ व २४ बाबतची आजरोजीची परिस्थीती 'जैसे थे' ठेवण्याचा आदेश पारित केला नाही तर वादींचा प्रस्तुतचा दावा दाखल करण्याचा हेतु निष्फळ होईल, या वादींच्या विधीज्ञांच्या युक्तिवादात तथ्य दिसून येते. त्यामुळे उपरोक्त सर्व परिस्थिती, दिनांक १९.१.२०२४ रोजीचा उपविभागीय अधिकारी यांचा आदेश, दिनांक २९.१०.२०२५ रोजीच्या पोटहिस्सा मोजणीच्या नोटीसांच्या छायांकीत प्रती, प्रतिवादी क्र. ३ यांनी जा.क्र. ९४५६ नुसार वादी क्र. १ हिस पाठविलेल्या पत्राची छायांकीत प्रत हे सर्व एकत्रीतरित्या विचारात घेवून न्यायाच्या दृष्टीने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तूतच्या दाव्यातील वादींचा तात्पुरता मनाईचा अर्ज निशाणी क्र. ५ याबाबत युक्तीवाद होईपर्यंत मौजे तांदळी, ता. मंगरुळपीर येथील गट क्र. ७६ व गट क्र. २४ बाबत आजरोजी असलेली परिस्थीती "जैसे–थे" ठेवावी, असा आदेश पारित करण्यात येत आहे.

२. पुढील तारखेस वादींनी निशाणी क्र. ५ बाबत युक्तीवाद करावा.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2025.12.12 17:42:19 +0530

स्थळ : मंगरुळपीर
दिनांक : १२/१२/२०२५.

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मंगरुळपीर

मी, खात्रीपूर्वक कथन करतो की, पी.डी.एफ. फाईलमधील न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | चिंतामण रा. गाडगे |
| न्यायालयाचे नांव | : | दिवाणी न्यायाधीश,व.स्तर मंगरुळपीर |
| निकाल दिनांक | : | १२.१२.२०२५ |
| न्यायनिर्णयावरील सही दिनांक | : | १२.१२.२०२५ |
| न्यायनिर्णय अपलोड दिनांक | : | १२.१२.२०२५ |